आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात वारकऱ्यांची अलोट गर्दी /मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शासकीय महापूजा, आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनाचं भूमिपूजन

- जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या सामाजिक दायित्व निधीतून ३८ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमध्ये संगणकीकरण करण्याच्या प्रकल्पाबाबत राज्यपालांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

- पुणे जिल्ह्यातले राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते-पदाधिकारी शरद पवारांकडे परतले

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकसाठी भारतीय संघाच्या यादीवर केंद्रीय क्रीडा मंत्रालयाचं शिक्कामोर्तब

**<><><><><>**

आषाढी एकादशी आज राज्यात भक्तिभावानं साजरी झाली. वारीसाठी पंढरपूर इथं वारकऱ्यांची अलोट गर्दी झाली होती. श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय महापूजा सपत्नीक केली. मानाचे वारकरी प्रतिनिधी म्हणून नाशिक जिल्ह्यातल्या बाळू अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशा यांना महापूजेचा मान मिळाला. यंदा राज्यभरात पाऊस चांगला झाला असून खरीपाची विक्रमी पेरणी झाली आहे, असं सांगत सर्वांना सुख, समृद्धी दे असं साकडं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाला घातलं.

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री तसंच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधकृष्ण विखे पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, यावेळी उपस्थित होते. यावेळी मानाच्या पालख्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आलं.

**आषाढी वारीसाठी** येणाऱ्या वारकऱ्यांसाठी सोलापूर जिल्हा प्रशासनानं

आरोग्य आणि स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्याबाबत आमच्या वार्ताहरानं माहिती दिली…

**होल्ड -- व्हॉईस कास्ट -- (महेश- पांढरे- ५१ सेकंद)**

**<><><><>**

**राज्यात इतरत्रही** विठ्ठल मंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. मुंबईत वडाळा इथल्या विठ्ठलमंदिरात भाविकांची गर्दी पहायला मिळाली.

आषाढी एकादशीनिमित्त रत्नागिरी शहरातल्या मारुती मंदिरापासून विठ्ठल मंदिरापर्यंत वारीचं आयोजन करण्यात आलं होतं. लहान मुलांसह विविध वयोगटांमधले स्त्री-पुरुष या वारीमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग म्हणत वारकऱ्यांनी रिंगण तयार केलं आणि फुगड्याही घातल्या.

विदर्भाची पंढरी मानल्या जाणाऱ्या **बुलडाणा** जिल्ह्यात संतनगरी शेगाव इथल्या संत गजानन महाराज संस्थानात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

**परभणी** जिल्ह्यात मानवत रोड इथल्या जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालय शाळेत आषाढीनिमित्त वृक्षदिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं. शाळेपासून रूढी गावापर्यंत निघालेल्या दिंडीत वृक्षारोपण, संवर्धन याविषयी मुलांनी घोषणा दिल्या.

**पालघरच्या** स्वामी विवेकानंद विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालयात व्यसनमुक्तीची दिंडी काढण्यात आली. यावेळी अंमली पदार्थविरोधी शपथ घेण्यात आली.

**धुळे** शहरातल्या प्रमुख विठ्ठल मंदिरात सकाळपासून भाविकांनी गर्दी केली होती. तसंच गोताणे गावातल्या विठ्ठल मंदिरात आज महापूजा करण्यात आली. यमुनाई शैक्षणिक आणि सांस्कृतिक महिला मंडळाच्या श्री संस्कार मतिमंद मुलींच्या बालगृहातही आषाढी एकादशी साजरी झाली. इथल्या विद्यार्थिनींना विठ्ठल-रखुमाईच्या पोषाखात सजवून त्यांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

**<><><><><>**

पंढरपूर इथं राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनाचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं. विठ्ठल मंदिर संवर्धनासाठी ७३ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून पंढरपूर तीर्थक्षेत्र आराखडा पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शाहू महाराज सांस्कृतिक भवनासाठी पाच कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून त्यात आणखी १० कोटींची भर घालण्यात येणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आषाढी एकादशी निमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. विठ्ठलाचा आशीर्वाद सर्वांवर सदैव राहो तसंच आनंद आणि

समृद्धीनं भरलेला समाज निर्माण होवो असं समाज माध्यमावर सामायिक केलेल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आशुरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तीभावानं पाळला जात आहे. या दिवशी प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या साथीदारांनी, सत्य, सत्व आणि न्याय या तत्वांसाठी करबलामध्ये  हौतात्म्य पत्करलं होतं. त्या स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.

छत्रपती संभाजीनगर इथं आज ताजिये तसंच सवाऱ्यांची मिरवणूक काढण्यात आली. शिया बांधवांच्या वतीनं मातमी जुलूसही काढण्यात आला. शेकडो नागरिक या मिरवणुकांमध्ये सहभागी झाले होते.

<><><><><>

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण-जे एन पी ए नं आपला सामाजिक दायित्व निधी उपलब्ध करून दिल्यामुळे राज्यातल्या एकलव्य मॉडेल निवासी विद्यालयांचे आदिवासी विद्यार्थी आजच्या स्पर्धात्मक युगाला आत्मविश्वासानं सामोरे जाऊ शकतील, असं राज्यपाल रमेश बैस यांनी म्हटलं आहे. राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबईत राजभवन इथे प्राधिकरणाच्या सामाजिक दायित्व निधीतून ३८ एकलव्य मॉडेल विद्यालयांमधे राबवायच्या या संगणकीय प्रकल्पासंदर्भात एका सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. या विद्यालयांचा शैक्षणिक स्तर, या प्रकल्पामुळे उंचावण्यास मदत होईल, असही राज्यपाल म्हणाले.  जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणानं आपल्या सामाजिक दायित्व निधीतून या प्रकल्पासाठी, ३ कोटी ५०लाख रुपये उपलब्ध करून दिले असून त्यातून एकलव्य मॉडेल विद्यालयांना १ हजार संगणक आणि

शिक्षकांसाठी ७६ टॅब्ज मिळणार आहेत. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सीड्रोम एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष विजय वासेकर यांच्यासोबत यावेळी सामंजस्य कराराचं हस्तांतरण केलं आणि प्रातिनिधिक स्वरूपाचा धनादेश दिला.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमधून ४ नेते आणि २४ पदाधिकारी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सामील झाले. बारामती इथं एका कार्यक्रमात, अजित गव्हाणे, आज़म पानसरे, माजी आमदार विलास लांडे आणि इतर नेते-कार्यकर्त्यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. यातले २४ जण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतले माजी नगरसेवक आहेत.

**<><><><>**

राज्यात शांतता नांदावी यादृष्टीनं, मराठा - ओबीसी वादावर तोडगा काढण्यासाठी आपण प्रयत्न करू असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितलं आहे. ते आज पुण्यात आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. या समुदायांमधला वाद मिटवण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती, मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना भेटून केली, त्या पार्श्वभूमीवर पवार बोलत होते. हा वाद निर्माण होण्यासाठी सत्ताधारीच जबाबदार असल्याचा आरोप पवार यांनी केला. मराठा समुदायाचे मनोज जरांगे आणि ओबीसी समाजातर्फे आंदोलन करणारे लक्ष्मण हाके यांच्याशी सरकारच्या प्रतिनिधींची चर्चा झाली असून आपल्याला त्याचा तपशील माहीत नाही, असं ते म्हणाले. त्याच करणानं, आरक्षणासंबंधी सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला आपण गेलो नव्हतो असं त्यांनी स्पष्ट केलं. या चर्चेचा तपशील

समजल्यास परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काही प्रयत्न करता येईल अशी प्रतिक्रीया पवार यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

पॅरिस ऑलिंपिकसाठी भारतीय संघाच्या यादीवर केंद्रीय क्रीडा मंत्रालयानं शिक्कामोर्तब केलं आहे. संघात ११७ खेळाडूंचा समावेश असून सोबत १४० तज्ञ, अधिकारी आणि कर्मचारी असतील. एथलेटिक्स प्रकारात सर्वाधिक २९ खेळाडूंची निवड झाली असून नेमबाजीसाठी २१ जण भाग घेणार आहेत. हॉकीसाठी १९, टेबल टेनिसकरता आठ आणि बॅडमिंटनसाठी सात खेळाडू भारताचं प्रतिनिधित्व करतील. मुष्टियुद्ध आणि तिरंदाजीसाठी प्रत्येकी ६, गोल्फ साठी ४ तर टेनिसकरता ३ खेळाडूंचा समावेश संघात केला आहे.  याखेरीज जलतरण, नौकानयन, भारोत्तोलन, ज्युदो इत्यादी क्रीडाप्रकारांमधे भारतीय खेळाडू भाग घेणार आहेत.
पॅरिस ऑलिंपिक क्रीडास्पर्धा येत्या २६ जुलैपासून सुरु होणार असून त्या ११ ऑगस्टपर्यंत चालतील.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात पोलीस माओवाद्यांमध्ये आज झालेल्या चकमकीत एक पोलीस उपनिरीक्षक जखमी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

जारावंडी पोलीस ठाण्याअंतर्गत छिंदभट्टी आणि पीव्ही 82 दरम्यान आज दुपारी ही चकमक झाली. चकमकीत जखमी झालेल्या उपनिरीक्षक सतीश पाटील यांना हेलिकॉप्टरनं गडचिरोलीला हलवलं आहे. या चकमकीत काही नक्षलवादीही जखमी झाल्याचं समजतं.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकणात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अतिजोरदार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात, कोकण आणि विदर्भात बुहतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**